MHAU060024972025

**फौजदारी किरकोळ अर्ज/307/2025 कन्नड ग्रामीण**

**रुखसारबी अनिसखा वि.. अनिसखा अलीखा**

**निशाणी १ खालील आदेश**

प्रस्तुत प्रकरणामध्ये गैरअर्जदार याच्याविरुध्द २,५०,०००/- रुपये थकीत असल्याने वसुल वॉरंट पाठविण्याचा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. या प्रकरणातील इतिहास पाहता गैरअर्जदार याने पुरेशी संधी असून देखील अर्जदाराच्या प्रती थकीत असणारी संपूर्ण रक्कम भरलेली नाही. त्यामुळे, दिनांक १७ जानेवारी२०२५ रोजी गैरअर्जदार याला कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली होती. तद्नंतर गैरअर्जदार याने अंशतः रक्कम म्हणून ९०,०००/- रुपये आजपर्यंत भरलेले आहेत. मात्र, गैरअर्जदार कारावासात असताना सदर रक्कम भरण्यात आली. तदनंतर तो न्यायालयासमक्ष कधीही हजर राहत नाही. त्याचे वडील न्यायालयाला आदेशाच्या प्रती मुदत मागतात. गैरअर्जदार यांची एकंदरीत वागणूकीबाबत आणि न्यायालया प्रती त्याने दर्शविलेला आदरभावाबाबत यापूर्वीच न्यायालयाने दिनांक १७ जानेवारी २०२५ रोजी पारीत केलेल्या आदेशामध्ये काही गोष्टी नमूद केलेल्या आहेत. असे होवून देखील गैरअर्जदार आपल्या वागणूकीत काही फरक करीत नाही, असे दिसून येते. तो न्यायालयासमक्ष प्रमाणिकपणे हजर राहत नाही. सबब, थकीत रकमेबाबत गैरअर्जदार अनिसखा याने पोटगीची रक्कम न भरल्यामुळे कारावासाची शिक्षा सुनावणे आता गरजेचे आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करतोः-

**आदेश**

१.गैरअर्जदार याच्याविरुध्द वॉरंट काढण्यात यावे.

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2026.02.16 17:54:08 +0530

(श्री वि.द. पाटील)

दिनांकः१६.०२.२०२६

दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथमवर्ग न्या. कन्नड
कन्नड,औरंगाबाद

## CERTIFICATE

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | |
|---|---|
| Name of Stenographer | Vishnu D. Khambat, (Grade-III) |
| Court | V. D. Patil, Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C. Kannad |
| Date | 16.02.2026 |
| Order signed by the Presiding Officer | 16.02.2026 |
| Order uploaded on | 16.02.2026 |